नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०८/२०२५ (शनिवार)**

---

## २४ तासच्या आत खुनाचा गुन्हा उघड ,३ आरोपी ताब्यात
## कोंढाळी पोलीस , स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण यांची संयुक्त कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे दिनांक. ३१/०७/२०२५ रोजी फिर्यादी नामे लक्ष्मीकौर मख्खनसिंग बावरी यांनी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे येवुन तोडी रिपोर्ट दिली की, त्यांचे पती नामे मख्खनसिंग रंजितसिंग बावरी वय—३८ वर्ष हे दिनांक .३०/०८/२०२५ रोजी चे रात्री ०८:३० वा.पासुन कामा निमित्त घरून गेले पण अजुन पर्यंत घरी परत आले नाही सदर रिपोर्ट वरून पो.स्टे.कोंढाळी येथे मिसींग क्रमांक २९/२०२५ दाखल करण्यात आली. सदर मिसींग चौकशी दरम्यान तपास दरम्यान दि.३१/०७/२०२५ रोजी मख्खनसिंग बावरी हा ज्या मोटार सायकलने घरून गेला होता ती मोटार सायकल कोंढाळी वर्धा रोडवर राहाटी गावाचे फाट्याचे बाजुला मिळुन आली. त्यांनतर दिनांक ०१/०८/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा. दरम्यान मख्खन सिंग याचा मृतदेह शिरमी डेपो शिवारात कोंढाळी परिसरातील झाडीझुडपात मिळुन आल्याने पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अप.क्र. ४०२/२०२५ कलम १०३(१),२३८ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर घटनेचे गांर्भीय लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अप्पर पोलीस अधिक्षक आणि श्री बापुर रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी , काटोल यांच्या मार्गदर्शनाखील तात्काळ सदर गुन्हयाचा तपास कोंढाळी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी सुरू केला. अज्ञात आरोपी शोध घेणे कामी पोलीसांची विविध पथके तायर करण्यात आली. तपास पथकांनी आरोपीचा कसुन शोध घेतला असता

तांत्रिक पुरावे व शास्त्रोक्त तपास करून पोलीसांनी सदर गुन्हयातील संशयीतांना तपासुन त्यांच्याकडे कौश्यलपुर्ण विचारपुस करून **यातील आरोपी क्रं १) रियाज अली रफतुल्ला अली, वय. १९ वर्ष, रा.तुलसीपुर तह.बलरामपुर राज्य उत्तर प्रदेश २) राहुल सरबजीत गौतम, वय २० वर्ष, रा.बस्ती, पोस्ट बत्रा, जि. सिध्दार्थनगर, राज्य उत्तर प्रदेश ३) चंद्रभान उर्फ चुन्नीलाल बाबुराम चौधरी, वय २८ वर्ष, रा.पत्रा बाजार तह.बार्शी, जि. सिध्दार्थनगर, राज्य उत्तर प्रदेश ह. मु. कोंढाळी आणि ४) विधीसंघर्ष ग्रस्त बालक** अशांना निष्पन्न करून आरोपी क्रं १ ते ३ ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता चुन्नीलाल चौधरी याचे कोंढाळी वर्धा रोडवर येथे कबाडचे दुकान आहे. कबाड व्यवसायासाठी चुन्नीलाल याने मृतक मख्खनसिंग बावरी कडुन व्याजावर तीन लाख रूपये घेतले असुन परत करण्यास नकार देत होता. त्यामुळे मख्खनसिंग आणि चुन्नीलाल यांचे आपसात भांडण झाले. मख्खनसिंग चे व्याजाने घेतलेले पैसे चुन्नीलाल याला परत करण्याचे नसल्याने चुन्नीलाल याने त्याचे दुकानात काम करणारे आरोपी रियाज अली आणि राहुल गौतम आणि विधीसंघर्षग्रस्त बालक यांना हाताशी धरून मख्खनसिंग याला त्याचेच मोटर सायकलवर बसवुन शिरमी डेपो शिवार कोंढाळी येथे घेवुन जाउन मख्खनसिंग याचा खुन करून मृतदेह तिथेच झाडीझुडपात फेकुन दिला आणि मख्खनसिंग याची मोटार सायकल कोंढाळी वर्धा रोडवर राहाटी गावाचे फाट्याचे रोडचे बाजुचे नाल्यात फेकुन दिली. सदर गुन्ह्यातील आरोपी क्रं १ ते ३ यांना अटकेची प्रक्रीया सुरू आहे. **सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांना पोलीसांनी २४ तासात शोधुन गुन्हयाची उकल केली. सदर गुन्हयाचा पुढील तपास कोंढाळी पोलीस करत आहेत.**

## चोरीचे ५ गुन्हे उघड , ५ मोटर सायकल जप्त
## १ आरोपी अटक, काटोल पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल चे गुन्हे प्रकटीकरणाचे पोलीस उपनिरीक्षक कृष्णा गोंगले, पोहवा कैलास उइके,पोहवा गौरव बखाल ,पोलीस अंमलदार राणा संतापे असे पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी नामे अश्विन अशोकनाथ राउत, वय २४ वर्षे, रा काळे चौक, काटोल** हा संशयीत रित्या एका मोटर सायकल सोबत मिळुन आला. नमुद आरोपीच्या ताब्यातील मोटर सायकलची

तपासणी केली असता नमुद मोटर सायकलचा इंजीन क्रमांक आणि चेचीस क्रमांक हे वेगवेगळया मोटार सायकलचे असल्याचे समजले. नमुद इंजीन क्रमांकाच्या वाहन चोरीचा गुन्हा पोलीस स्टेशन काटोल येथे नोंद असुन चेचीस क्रमांकावरून वाहनाचा क्रमांकाचा शोध घेतला असता वाहन क्रं एमएच ४० ए पी ६४३८ असा क्रमांक प्राप्त झाला. नमुद वाहन क्रमांक बाबत तपास केला असता पोलीस स्टेशन उमरेड येथे सदर वाहन चोरीचा गुन्हा नोंद असल्याचे निष्पन्न झाले.

काटोल पोलीसांनी आरोपीला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने काटोल शहरातुन मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिली. दिनांक २७/०७/२०२५ रोजी काटोल पोलीसांनी नमुद आरोपीला अटक करून त्याचा पोलीस कस्टडी रिमांड घेवुन त्याला कसुन विचारपुस केली असता त्याने काटोल शहर आणि चिखलागड येथुन चोरी केलेल्या मोटर सायकल बाबत माहीती दिली. नमुद आरोपी हा स्वतः मेकॅनिक असल्याने तो मोटर सायकल चोरी करून वेगवेगळे पार्ट जोडुन नविन मोटार सायकल तयार करीत होता तसेच मोटर सायकलाला बनावट नंबरप्लेट लावत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले.

पोलीसांनी नमुद आरोपीकडुन **वेगवेगळया पार्ट जोडुन तयार केलेल्या बनावट नंबर प्लेट असलेल्या ५ मोटर सायकल किंमती १,००,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी नामे** आरोपी नामे अश्विन अशोकनाथ राउत, वय २४ वर्षे, रा काळे चौक, काटोल याला मा. न्यायालयाने न्यायालयीन कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे**

**१. पोलीस स्टेशन काटोल अप क्र १०६३/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं**
**२. पोलीस स्टेशन काटोल अप क्र १७४/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं**
**३. पोलीस स्टेशन काटोल अप क्र ६०९/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं**
**४. पोलीस स्टेशन काटोल अप क्र ०७/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं**
**५. पोलीस स्टेशन उमरेड अप क्र २८३/२०२३ कलम ३०३ (२) भा.न्या.सं**




## लाल सुपारी वाहतुक करणाऱ्यांवर गुन्हा नोंद, ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग, बोरी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची संयुक्त कामगिरी

दिनांक ०१/०८/२०२५ रोजी सांयकाळी १७.०० वा चे सुमारास श्री. दिपक अग्रवाल, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांना गोपनिय माहिती प्राप्त झाली की, हळदगाव टोल प्लाझा जवळील जीत पंजाब ढाब्याजवळ एक ट्रक मध्ये लाल रंगाची सडकी सुपारीची वाहतुक होत असुन तिचा वापर प्रतीबंधीत सुंगधित पान

सुपारी , पान मसाला ,गुटखा याचे निर्मीतीसाठी किंवा अवैध व्यवसायकामी केला जात असण्याची शक्यता आहे.

प्राप्त माहीतीनुसार श्री. दिपक अग्रवाल , सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग, पोलीस निरीक्षक प्रतापराव भोसले प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन बोरी , सपोनि अजितसिंग देवरे , पोउपनि खानजोडे, पोउपनि सचिन उरकुडे, पोहवा / कुणाल ठाकुर , नापोशि नितेश राठोड , स्थानिक गुन्हे शाख नागपुर ग्रा.पथकाचे पोहवा /विष्णु अशांनी पंचासह सदर ठिकाणी जावुन ट्रक क्र. के.ए.१६ ए.ए.५७७२ ची पंचासमक्ष पाहणी केली असता लाल रंगाची व सडक्या स्वरुपाची सुपारी भरलेली असल्याचे दिसुन आले. ट्रक चालकाचे नाव थिप्पेस्वामी मंजप्पा, रा .कर्नाटक असे असल्याचे समजले. पोलीसांनी पंचासमक्ष त्यात ३१. ५ टन लाल रंगाची व सडक्या स्वरुपाची सुपारी किंमती ३२,००,००० /— रूपये आणि ट्रक क्र. के. ए. १६ ए.ए.५७७२ किंमती ४०,००,०००/— रुपये असा एकुण ७२,००,००० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर मुद्देमाल व चालक नामे थिप्पेस्वामी मंजप्पा रा .कर्नाटक यास अन्न प्रशासन विभाग नागपुर येथिल अधिकारी नामे किरण गेडाम यांचे ताब्यात पुढील कारवाईसाठी देण्यात आलेले आहे. सदर ट्रक हा कर्नाटक येथुन नागपुर येथे एका व्यापाऱ्याकडे जात असल्याबाबत प्राथमीक तपासात निष्पन्न झालेले असुन अन्न प्रशासन विभागाचे अहवालानुसार पुढील कायदेशिर कारवाई केली जाणार आहे.




## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :— दिनांक ३१/०७/२०२५ रोजी कन्हान पोलीस हे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशिर माहीती मिळाली की, जे. एन. गेट कांद्री कन्हान येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपी नामे परजितसिंग उर्फ रॉनी सुच्चासिंग सिध्दु हा हातात चाकु आणि एक लोखंडी हत्यार घेवुन फिरत आहे. त्यामुळे लोकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहीतीन्वये पोलीसांनी तात्काळ पंचासह नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता एक इसम त्याचे हातात लोखंडी रॉडला, मोटर सायकलचे चेन सॉकेट आणि लोखंडी रिंग जोडलेले हत्यार घेवुन असल्याचे दिसुन आले. त्याला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **परजितसिंग उर्फ रॉनी सुच्चासिंग सिध्दु, वय ३९ वर्षे, पत्ता. जे.एन. हॉस्पीटल जवळ, मातोश्री लॉन, कांद्री ता. पारशिवणी जि. नागपुर** असे सांगितले. तसेच पोलीसांनी नमुद आरोपीची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे जवळ एक चाकु मिळुन आला. दोन्ही हत्यार आरोपीच्या ताब्यातुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

**आरोपी नामे—** परजितसिंग उर्फ रॉनी सुच्चासिंग सिध्दु, वय ३९ वर्षे, रा. जे.एन. हॉस्पीटल जवळ, मातोश्री लॉन, कांद्री ता. पारशिवणी जि. नागपुर **याच्या विरूद्ध पोस्टे कन्हान**

**येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५** महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## हद्दपार आरोपीवर आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान :—** कन्हान पोलीस, पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराने माहीती दिली की, नागपुर जिल्हयातुन हद्दपार असलेला आरोपी नामे विशाल नामदेव चिंचोळकर रा धरम, नगर कन्हान हा त्याचे घरी धरमनगर येथे राहत आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी पंचासह नमुद ठिकाणी आरोपीच्या घरी जावुन पाहणी केली असता **आरोपी नामे विशाल नामदेव चिंचोळकर, वय ३८ वर्षे, रा धरम, नगर कन्हान** हा घरी मिळुन आला. नमुद आरोपीला मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये दिनांक ११/११/२०२४ रोजी नागपुर जिल्हयातुन एक वर्षा करीता हद्दपार केले असुन आरोपीने नागपुर जिल्हयात येण्याची कायदेशीर परवानगी न घेता धरमनगर, कन्हान येथे राहत असल्याने त्याचेवर कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६७८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०२/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६७८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३५ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण १०१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २२ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण १०८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे ३१ आरोपी अशा एकुण १२१ उरेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २० आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६७८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**


पोलीस स्टेशन,रामटेक.








## रात्र गस्त दरम्यानकोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०१/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०२/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत सिल्लेवाडा, पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत मौदा टाउन आणि माथनी गावात तसेच पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत धरमनगर,सुपर टाउन, गहुहिवरा, संताजी नगर, वार्ड क्रं ४ शिवनगर ,शिवाजी नगर येथे श्री संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून

त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली.







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने